Annexure XXXI(1),(Vide Article-31.01.01)

**अर्थसंकल्प वितरण प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग, मंत्रालय,**
**मुंबई : ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-१००६/प्र.क्र.१३१/कोषा प्रशासन-५,**
**दिनांक १५ मे, २००७.**

**प्रस्तावना :** सन २००५-२००६ पासून शासनाने जमा व खर्चाचे योग्य नियोजन करण्याच्या हेतुने व त्याचा समतोल राखण्यासाठी "मासिक निधी विवरणपत्र" तयार केले असून त्यानुसार खर्च करणे अनिवार्य केले आहे. ही पध्दत सन २००६-२००७ मध्ये पुढे चालू ठेवली असून सन २००७-२००८ मध्ये पुढे सुरू ठेवण्यात येणार आहे.

२. मासिक निधी विवरणपत्रानुसार उपलब्ध निधी खर्च होतो किंवा कसे याबाबत संगणकीकृत (computerised) व्यवस्था नसल्याने अर्थोपाय नियंत्रण करताना अडचणी आलेल्या आहेत. प्रचलित पध्दतीनुसार आहरण व संवितरण अधिका-यांना देयक सादर करण्यापूर्वी निधी मंजूरीचे आदेश प्रत्यक्ष प्राप्त करून घ्यावे लागतात. हे आदेश मिळण्यास बराच कालावधी लागतो व त्यामुळे विहित वेळेत देयक सादर करता येत नाही. परिणामी, योजनेसाठी तातडीने खर्च करण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच अर्थसंकल्पीय तरतुदींच्या आहरण व संवितरण अधिकारीनिहाय वितरणाचे तपशील एकत्रितरित्या उपलब्ध नसल्याने हे अधिकारी तरतूदींच्या /मासिक निधी विवरणपत्राच्या (Monthly Cash Flow Statement) मर्यादेत खर्च करीत आहेत किंवा कसे याची पडताळणी करणे शक्य होत नाही. या माहितीअभावी कोषागारांना देयके पारित करताना अडथळे /अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. हे लक्षात घेता सर्व विभागांमध्ये आर्थिक शिस्त व सुयोग्य नियंत्रण येण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचे सहकार्याने वित्त विभागाने " संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली" विकसित केली आहे. " संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली" चा मुख्य उद्देश शासनाच्या विविध विभागातील आहरण व संवितरण अधिकारीनिहाय अर्थसंकल्पीय अनुदानाच्या तरतूदी इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून सर्व कोषागार अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी व इतरांना उपलब्ध व्हाव्यात, तसेच आहरण व संवितरण अधिका-यांना अर्थसंकल्पीय अनुदानातून देयकांद्वारे रकमा आहरित करणे सुलभ व्हावे हा आहे.

४. त्याचप्रमाणे या प्रणालीच्या वापरामुळे पतपत्र धारक प्राधिका-यांना यापुढे त्यांचे धनादेश कोषागारांस पृष्ठांकनाकरिता पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही अशी सुध्दा सोय करण्यात आलेली आहे.

५. या शिवाय कोषागारामध्ये देयके सादर करण्याची कार्यपध्दती व वेळपत्रकात अधिक सुलभता आणण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

६. या कार्यप्रणालीच्या अमंलबजावणीकरिता शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

१. महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २००७ क्रमांक १० म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध झालेली १००% तरतूद खालील अपवाद वगळता विभागाला परस्पर मासिक निधी वितरणपत्रान्वये खर्च करण्यास उपलब्ध करण्यात येत आहे.

२. खालील बाबींवरील अर्थसंकल्पीय तरतूदी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय खर्च करता येणार नाहीत-

(अ) बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केलेल्या सर्व तरतूदी.

(ब) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी व राज्य शासनाच्या हिश्याचा निधी हा केंद्र शासनाकडून निधी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याशिवाय वितरित करता येणार नाही अशा तरतूदी.

(क) भांडवली अर्थसंकल्प विहित पध्दतीने मंजूर झाल्याशिवाय महामंडळाच्या भांडवली अंशदानासाठी केलेल्या तरतूदी.

(ड) विद्युत महामंडळ व त्या अंतर्गत असणा-या कंपन्या यांना देय अर्थसहाय्य, भाग भांडवल व कर्जाच्या तरतूदी.

(इ) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास सवलतीपोटी देय अर्थसहाय्याच्या तरतूदी.

३. प्रशासकीय विभागांनी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीचा उपयोग करुन निधी वितरित करणे बंधनकारक राहील. या प्रणालीव्दारे वितरित केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदींचे वाटपाकरिता शाईच्या स्वाक्षरीचे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता राहणार नाही.

४. कोषागाराला सादर करण्यात येणाऱ्या प्रत्येक देयकासोबत या संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे छापून घेतलेली प्राधिकार पत्राची प्रत लावणे आवश्यक राहील. कोणत्याही शीर्षाखाली अनुदान उपलब्ध नसल्यास आहरण व संवितरण अधिकारी यांना असे प्राधिकार पत्र मुद्रित करता येणार नाही. अशा प्राधिकार पत्राशिवाय कोषागार कार्यालय व अधिदान व लेखा अधिकारी देयके स्वीकारणार नाही.

५. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत वितरीत करण्यात आलेल्या निधीसाठी व या प्रणालीमार्फत छापून घेतलेल्या प्राधिकारपत्राप्रमाणे तयार केलेल्या धनादेशासाठी प्राधिकारपत्रधारक अधिका-यांना कोषागार अधिकाऱ्याच्या पृष्ठांकनाची आवश्यकता राहणार नाही.

६. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे अर्थसंकल्पीय तरतूदींचे वाटप केल्यामूळे आहरण व संवितरण अधिकारी यांना प्रत्येक महिन्यात कोणत्याही प्रकारचे देयक कोणत्याही दिनांकास कोषागारात सादर करता येईल.

७. " संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली" ही Intranet / Internet च्या माध्यमातून उपलब्ध आहे. ही प्रणाली वित्त विभाग (अर्थसंकल्प शाखा) यांच्या नियंत्रणाखाली असेल.

८. या कार्यप्रणालीची अंमलबजावणी दि.१ जून, २००७ पासून करण्यात यावी. सध्या या योजनेतून वेतन देयके वगळण्यात येत आहेत. वेतन देयकांकरिता करावयाच्या अंमलबजावणीची तारीख दि.१ ऑगस्ट,२००७ ही असेल.

**वित्त विभागाकडून निधीचे वितरण :**

९. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीच्या पहिल्या टप्प्यात विधीमंडळाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानाचे (मुख्य लेखाशीर्षानिहाय), मासिक निधी विवरणपत्रानुसार (Monthly Cash Flow Statement) संबंधित प्रशासकीय विभागांना वित्त विभागाकडून वितरण केले जाईल. सदर वाटप हे अर्थसंकल्प वितरण प्रणालीचा उपयोग करुन करण्यात येईल. सन २००७-०८ या वित्तीय वर्षासाठी तरतूद वितरीत करण्यात आली आहे.

**प्रशासकीय विभागांकडून अर्थसंकल्पीय तरतुदींचे वाटप :**

१०. वित्त विभागामार्फत निधी वितरीत झाल्यानंतर दुस-या टप्प्यात संबंधित प्रशासकीय विभागाने मुख्यलेखाशिर्षनिहाय प्राप्त झालेल्या रकमांचे, प्रथमत: योजनानिहाय, उपलेखाशिर्षनिहाय व उद्दिष्टनिहाय मासिक नियोजन करावे. हे नियोजन करताना टप्पा १ मधल्या वित्त विभागाने घालून दिलेल्या मासिक मर्यादा तसेच अर्थसंकल्पीय तरतूदी ओलांडल्या जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. वित्त विभागाने घातलेल्या मर्यादा या विभागांनी कळविल्यानुसार घालण्यात आल्या असल्यामुळे अशा मर्यादांचे पालन करण्यात विभागांना अडचणी येणार नाहीत.

११. तिसऱ्या टप्प्यात प्रशासकीय विभागांनी संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे तरतूदींचे वाटप नियंत्रक अधिकाऱ्यांना करावे. सदर तरतूदीचे वितरण हे योजनानिहाय, उपशिर्षनिहाय, उद्दिष्टनिहाय असेल. हे वाटप करताना परिच्छेद २ मधील प्रशासकीय विभागांना घालून दिलेल्या मर्यादा ओलांडल्या जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

१२. शेवटच्या टप्प्यात नियंत्रक अधिकारी, त्यांच्या अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिका-यांना अनुदानाचे वितरण संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे करतील. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे तरतूदींचे वाटप केल्यास शाईच्या स्वाक्षरीचे अनुदान वाटप आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता राहणार नाही.

१३. आहरण व संवितरण अधिकारी त्यांचेकडील तरतुदीचे आणखी वितरण इतर आहरण व संवितरण अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार करु शकेल. परंतु त्याकरिता नियंत्रक अधिका-यांची या संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमार्फत मान्यता प्राप्त केल्याशिवाय अशा तरतूदी वितरीत करता येणार नाहीत.

**आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागारात सादर करावयाची देयके :**

१४. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीनुसार आहरण व संवितरण अधिकारी यांना त्या त्या महिन्यामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्च करता येईल. आहरण व संवितरण अधिका-याने अशा प्रत्येक देयकाची नोंद संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमध्ये करणे बंधनकारक आहे. सदर नोंद घेतांना खर्चाचे लेखाशीर्ष, स्थूल व निव्वळ रकमा, वजाती संदर्भात जमा/खर्चाच्या रकमा इ. सर्व बाबींचा उल्लेख करण्यात यावा. देयकापोटी काढावयाचा धनादेश ज्यांच्या नावे काढावयाचा आहे, त्यांच्या बँकेचे नाव, शाखेचे नाव, बँक खात्याचा क्रमांक, संगणकीय

अर्थसंकल्प वितरण प्रणालीत देयकांची नोंद करतानाच दर्शविणे आवश्यक राहील. अशी नोंद केल्यानंतर संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून विशिष्ट संकेतांक असणारे प्राधिकार पत्र मुद्रित करता येईल. हे प्राधिकार प्रत द्विप्रतीत तयार करावे. या दोन्ही प्रतींवर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करुन त्या देयकासोबत जोडाव्यात.

१५. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे मुद्रित केलेल्या प्राधिकार पत्राच्या दोन प्रती देयकासोबत जोडल्या नसल्यास, कोषागार अधिकारी /अधिदान व लेखा अधिकारी देयके स्वीकारणार नाहीत.

१६. देयकासोबत जोडलेल्या प्राधिकार पत्राच्या एका प्रतीवर देयक प्राप्त झाल्याबाबतची पोच म्हणून कोषागार अधिका-यांनी त्यांच्या शिक्क्यासह स्वाक्षरी करावी व ती आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना परत करावी. देयक पारित झाल्यास, सदर दुस-या प्रतीवर धनादेश प्राप्त करण्याकरिता ज्याला प्राधिकृत केले आहे त्या कर्मचाऱ्याला कोषागाराकडून धनादेश वितरित केला जाईल. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे दिला जाणारा प्राधिकार पत्रावरील विशिष्ट संकेतांक कोषागार अधिका-यांनी धनादेशावर नोंदवावा.

<u>पतपत्र पध्दतीबाबत :</u>

१७. यापुढे पतपत्र पध्दत वरील योजनेमुळे रद्दबातल ठरेल. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, वन विभाग, दुग्धव्यवसाय, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तसेच विक्रीकराच्या परताव्याच्या रकमा इत्यादीसाठी पतपत्र निर्गमित करण्याची आवश्यकता रहाणार नाही. या अर्थसंकल्प वितरण व्यवस्थेद्वारे होणारे वाटप हेच पतपत्र म्हणून समजण्यात येईल. पतपत्राची कार्यपध्दती लागू असणा-या विभागीय अधिका-यांनी यापुढे संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे अनुदान वितरित करावे.

१८. पतपत्र अधिका-यांद्वारे दिले जाणारे धनादेश पृष्ठांकनासाठी कोषागारांकडे पाठविण्याची आवश्यकता रहाणार नाही. परंतु, असे धनादेश वितरित करण्यापूर्वी प्रत्येक धनादेशाची नोंद वर परिच्छेद १४ मध्ये दर्शविलेल्या पध्दतीप्रमाणे या प्रणालीत घेणे बंधनकारक राहील. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून उपरोक्त १४व्यां परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे नोंद घेतल्यानंतर पतपत्रधारक अधिका-यांनी प्राधिकार पत्राची प्रत मुद्रित करुन ती आपल्या लेख्यात जपून ठेवावी तसेच उपरोक्त प्रणालीद्वारे दिल्या गेलेल्या विशिष्ट संकेतांकाची नोंद धनादेशाच्या पाठिमागे न विसरता करावी.

१९. अशा संकेतांकांची नोंद धनादेशावर नाही असे कोषागार अधिका-यांच्या निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेऊन पतपत्रधारक अधिका-यांचे अधिकार रद्द करण्यात येतील.

<u>प्रशिक्षण :</u>

२०. ही प्रणाली वापरण्याकरिता अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाची व्यवस्था वित्त विभाग, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचे सहकार्याने करील. प्रशिक्षणाचा कार्यक्रम लेखा व कोषागारे संचालनालयाच्या संगणक शाखेने तयार करुन वित्त विभाग व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या सहकार्याने आयोजित करावा. सर्व प्रशासकीय विभागातील अर्थसंकल्पविषयक कामकाज पाहणा-या सहसचिव/उपसचिव/ अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येईल. तदनंतर असेच

प्रशिक्षण सर्व विभाग प्रमुखांना देण्यात येईल. त्याबाबतचे वेळापत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे. सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचे अधिनस्त असणा-या नियंत्रक अधिका-यांना प्रशिक्षण द्यावे. तसेच त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना सदर प्रणालीबाबत प्रशिक्षित करावे.

२१. प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी सकाळी १०.३० ते दुपारी ४.३० पर्यंतचा वेळ विभागीय उपसंचालक लेखा व कोषागारे यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी (प्रशिक्षण) यांनी प्रशिक्षणासाठी राखीव ठेवावा. नियंत्रक अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी यांना पूर्व सूचनेशिवाय अशा प्रशिक्षणास उपस्थित राहता येईल. याशिवाय "लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिनस्त असणा-या प्रत्येक विभागीय उपसंचालकांनी त्यांच्या कार्यालयातील सहाय्यक संचालक आणि लेखा अधिकारी (प्रशिक्षण) यांच्या सहकार्याने त्यांच्या महसूली विभागातील नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांचे प्रशिक्षण विभागीय आयुक्तांशी विचार विनिमय करुन आयोजित करावे. तसेच या प्रणालीसंबंधी नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना वेळोवेळी येणा-या अडचणींचे निराकरण करावे.

२२. प्रत्येक कोषागाराने सुध्दा नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना आवश्यक ती सर्व मदत (संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली व्दारे वितरण करुन प्राधिकार पत्र मुद्रित करण्यापर्यंत) करावी.

२३. प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या जिल्हा उद्योग केंद्र (D.I.C.) आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे जिल्हा माहिती अधिकारी (D.I.O.) यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करुन त्यांच्या माध्यमातून नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना येणा-या सर्व प्रकारच्या अडचणींचे निवारण करण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात. जिल्हाधिका-यांनी सेतू प्रकल्पाच्या माध्यमातूनही नियंत्रक अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांना अशा सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

<u>मदत कक्ष :</u>

२४. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली वापरताना येणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी वित्त विभाग, अर्थसंकल्प शाखेत मदत कक्षची (Help Desk) निर्मिती करण्यात येत असून हा कक्ष तिसरा मजला कक्ष क्र.३०७ येथे कार्यरत राहिल.

<u>इतर :</u>

२५. सद्यस्थितीत संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे नेमून दिलेल्या निधीच्या वितरणाचे कार्य पार पाडले जाणार आहे. अर्थसंकल्पीय रकमांचे पुनर्वितरण, पुनर्विनियोजन करणे, आकस्मिकता निधीतून मंजूरी देणे आणि त्याद्वारे मिळणारी रक्कम तसेच पुरवणी मागणीद्वारे मिळणा-या रकमा यांचे वितरण करणे इत्यादिबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२६. या प्रणालीच्या अंमलबजावणीकरिता सर्व प्रशासकीय विभाग, त्यांचे अधिपत्याखालील नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी या शासन निर्णयाद्वारे दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील. प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी यांनी

त्यांच्या विभागाच्या आहरण व संवितरण अधिकारीनिहाय तरतूदी संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारेच वितरित केल्या जातील याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिका-यांना सूचना निर्गमित कराव्यात.

२७. हा शासन निर्णय शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध असून त्यांचा संकेतांक २००७०५१५१६४२३८००१ असा आहे.

( न.मं.पाटील )
शासनाच्या उपसचिव
वित्त विभाग.

प्रत,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सचिव ,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालय प्रमुख,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा ), महाराष्ट्र, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( मुळ शाखा ),मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा ), मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी,
सर्व उपकोषागार अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, वित्त विभाग कोषागारे ५. * पत्राद्वारे.